# महानुभाव संप्रदाय

**प्रा. इंद्रायणी डी. सैंदाणे,**
**मराठी विभाग प्रमुख,**
**महिला महाविद्यालय, अमळनेर,**
**जि.जळगांव मोबा. ९४०३८३३५२१**

*यादवकाळ म्हणजे मराठी साहित्याचे सुवर्णयुग. या काळात निर्माण झालेल्या मराठी साहित्याने मराठी वाङ्मयाच्या इतिहासात अत्यंत मोलाची भर घातली व त्याला समृद्ध केले. या काळात महाराष्ट्रात विविध संप्रदाय अस्तित्वात होते. या संप्रदायांचे प्रवर्तक आपापले सिद्धांत सर्वसामान्यांसमोर ठेऊन त्यांना मुक्तीचा मार्ग दाखविण्याचा प्रयत्न करीत होते. तेराव्या शतकातील या वाङ्मयनिर्मितीत महानुभाव साहित्याचा सिंहाचा वाटा आहे.*

मुकुंदराजाच्या नंतरच्या काळात व संत ज्ञानेश्वरांच्या आधी महानुभाव पंथ वऱ्हाडात उदयास आला. संत ज्ञानेश्वरांच्या पूर्वी १५-२० वर्षे या पंथीयांनी मराठीत गद्य-पद्यात्मक रचनेला सुरूवात केलेली होती. महानुभाव पंथाला अनेकनांवे दिलेली आहेत. परमेश्वर प्राप्तीचा आणि वैराग्याचा एक मार्ग यादृष्टीने ह्या पंथाचा उल्लेख-मार्ग, महात्मापंथ, प्रतितीपंथ, परमार्ग, परमेश्वर शास्त्र, अच्युतगोत्रीय इ. पंजाबात ह्या पंथाला 'जय कृष्णीय पंथ' असेही म्हणतात.

**हा प्रतिती पंथ देमती |**
**तुम्ही अच्युतगोत्रीय की गा |**
**परमेश्वरशास्त्री एवं वा नाही |**
**तुम्ही महत्मे की गा |**
**तो नमस्कार परामार्ग दाताराचा |**

महानुभाव शब्दाचा योगीक अर्थ 'महान अनुभवी' असा असून त्याचा अपभ्रंश 'मानभाव' असा मराठीत रूढ झालेला आहे. शिवाय ढोंगी, कपटी अशा अर्थानेही हा शब्द वापरला जातो. ज्ञानेश्वरांपासून सर्व कवी महान अनुभवी या अर्थानेच 'महानुभाव' हा शब्दप्रयोग वापरतात. 'भटमार्ग' असाही या पंथाचा उल्लेख केला जातो. नागदेवाचार्य यांना भटोबास म्हणत आणि म्हणूनच त्यांचा जो मार्ग तो भटमार्ग होय. महानुभावपंथ श्री.चक्रधरांना परमेश्वर मानतो त्यामुळे त्यांचा जो मार्ग तो परमार्थ होय. श्रीकृष्ण हे महानुभावपंथाचे आद्य दैवत आहे. त्यांची गुरूपरंपरा पुढीलप्रमाणे आहे.

श्रीकृष्ण - श्री. दत्तात्रेय प्रभु - श्री.चांगदेव राऊळ - श्री. गोविंद प्रभु - श्री.चक्रधर स्वामी. महानुभावपंथाचे संस्थापक श्री.चक्रधर यांच्या विषयीचा निरतिशय श्रद्धाभाव त्यांच्या शिष्यवर्गातून पुन्हा-पुन्हा प्रकट झालेला दिसतो. श्रीकृष्ण पंचकास महानुभाव पंथात महत्त्वाचे, श्रेष्ठ स्थान आहे. ह्या पंचकृष्णावर त्यांची आत्यंतिक श्रद्धा होती. ह्यांचा श्रीकृष्ण म्हणजे श्री.विष्णूचा मर्यादित अवतार असून ते व्यापक साक्षात परब्रह्म होय. भारतीय परंपरेतील श्रीकृष्ण व महानुभाव यांचा श्रीकृष्ण ह्यांच्यात भेद दिसतो.

**'श्री दत्तात्रेय प्रभुचा चतुर्युगी अवतारू'**

ह्या शब्दात त्यांनी दत्तात्रेयाचे श्रेष्ठत्त्व मान्य केले आहे. महानुभावी यांचा दत्तात्रेय म्हणजे अनसुयेच्या उदरी जन्मलेला पूर्णब्रह्म परमेश्वर होय. परंतु दत्तवंतास ब्रह्मा-विष्णू-महेश यांनी एकवटलेली त्रीमुखी अष्टभूजा अशी मूर्ती डोळ्यासमोर उभी राहते. महानुभावपंथी यांनी दत्ताचे स्वरूप तीन शिरे, सहा हात असे न मानता एकमुखी चतुर्भुज असे मानलेले आहे.

**महानुभावांचे तत्त्वज्ञान :-**

महानुभावी चार युगाचे चार अवतार मानतात.

१) कृतयुग - हंसावतार

२) त्रेतायुग - दत्तावतार

३) व्दापार युग - श्रीकृष्ण चक्रवर्ती

४) कलियुग - श्री.चक्रधर

जीव, देवता, प्रपंच, परमेश्वर ही चार तत्त्वे प्रमुख मानली जातात. जीव हा बद्धमुक्त, देवता - नित्यबद्ध, प्रपंच - अनित्य, परमेश्वर - नित्यमुक्त आहे. महानुभाव हा पंथ वैदिक की अवैदिक याविषयी अभ्यासकात मतभेद आहेत. परंतु वैदिक धर्माशी ह्या पंथाचे साम्य आढळते. श्रुती, स्मृती, उपनिषदे यातील निवडक वाक्य काही ठिकाणी जशीच्या तशी घेतलेली आहेत. जीव व परमेश्वर यांचा महानुभाव पंथीयांनी सांगितलेला संबंध पाहता हा पंथ व्दैतवादी असल्याचे स्पष्ट होते.

**महानुभावांची ग्रंथरचना :-** साहित्याच्या दृष्टीकोनातून महानुभावांची ग्रंथरचना अतिशय महत्त्वाची आहे. प्रत्यक्ष चक्रधरांनी रचलेला असा एकही ग्रंथ नाही; त्यांनी आपल्या शिष्यांना वेळोवेळी जो उपदेश केला त्याचे संकलन पंथीयांनी/ त्यांच्या अनुयायांनी केले. तेच ग्रंथरूपाने प्रसिद्ध आहे. चक्रधरांनी आपला पंथीय उपदेश हा मराठीतून केला. महाराष्ट्र व मराठी भाषा यांच्याबद्दल त्यांच्या मनात आत्यंतिक आदराची, श्रद्धेची भावना होती.

'महाराष्ट्री असावे' असे ते आपल्या शिष्यांना वेळोवेळी सांगत. त्यामुळे महानुभाव पंथीय ग्रंथाची रचना ही त्यामुळे बहुतांशी मराठीतच झालेली दिसते.

**सिद्धांत सूत्रपाठ (आचार्य सूत्र) :-**

केसो बास (केशी राज बास) अत्यंत विद्वान, विदग्ध आणि पंथनिष्ठ पांडित्य म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांचे परममित्र दामोदर पंडित व रामदेव यांच्या बरोबर त्यांची नेहमी शास्त्र चर्चा चाले. विरक्ती ही केसोबासांची विशेष प्रभावी शक्ती. विवाहित असूनही तारूण्यावस्थेत त्यांनी पंथात प्रवेश केला. 'रत्नमाला स्तोत्र' ही संस्कृतातील त्यांची पहिली रचना लीलाचरित्रातील अनेक लीलांचा संस्कृत पद्यात त्यांनी अनुवाद केला. तेव्हा नागदेवाचार्यांनी नाराजी दर्शविली. त्यानंतर मात्र 'सिद्धांत सुत्र' पाठाची रचना त्यांनी केली. आपल्या शिष्यांना उपदेश करतांना श्री.चक्रधरांच्या मुखातून वेळोवेळी जी उपदेशपर वाक्य निघाली ती जशीच्या तशी श्री.म्हाईंभटाने लिहून ठेवली. ही म्हाईंभटाने लिहून ठेवलेली सूत्र केशी राज बास व अनिराज या दोघा भावांनी ग्रंथबद्ध केली. हीच सिद्धांत सूत्रपाठाची रचना होय. ही सूत्र महानुभाव पंथीय लोक नित्य-नियमाने वाचतात त्यात एकांही शब्द-काना-मात्रेचा ही बदल होऊ न देण्याची दक्षता ते घेतात. ह्या सांप्रदायिक ग्रंथात १६०९ सूत्रे असून ती अकरा भागात विभागली असल्याचे काही अभ्यासकांचे मत आहे. सूत्रपाठ म्हणजे महानुभावांच्या तत्त्वज्ञानाला प्रमाणभूत असलेला, आधारभूत असलेला प्रमुख ग्रंथ होय.

**दृष्टांतपाठ :-**

केसोबासांनी संपादित केलेला हा ग्रंथ, सर्व-सामान्य लोकांना गहन तत्त्वज्ञान सुलभतेने, त्यांना समजेल अशा दृष्टीने त्यांना परिचित वस्तुंचे दृष्टांत देऊन त्या आधारे तत्त्वज्ञान सांगण्याचा प्रयत्न त्यांनी केला. जवळ-जवळ ११४ दृष्टांत केसोबासांनी संकलित केलेले आहेत. श्री.चक्रधरांनी आपल्या भ्रमंतीच्या काळात वेळोवेळी आपल्या शिष्यांना सांगितले. भटोबास महदाईसा रामदेव, बाईसा या शिष्यांना बहुतांश दृष्टांत त्यांनी दिले. काही दृष्टांत पैठण व डोमेग्राम

येथे सांगितले आहेत. एका ठिकाणाहून दुसरीकडे जातांना, एवढेच काय दैनंदिन कार्य करीत असतांना ही वेळ प्रसंगी हे दृष्टांत त्यांनी सांगितले आहेत. एक छोटीशा बोधयुक्त कथा असेच दृष्टांताचे स्वरूप आहे. प्रत्येक दृष्टांताचे तीन भाग आहेत. १) शिरोधार्य, २) सूत्र, ३) द्राष्टांतीक इ. त्यापैकी सूत्र आणि दृष्टांत हे चक्रधर निरूपीत आणि द्राष्टांतिक केसोबासांचे असे त्यांचे स्वरूप आहे. चक्रधरांनी रचलेल्या दृष्टांताचा व सूत्रांचा काळ सुमारे ११९० ते ११९५ असा व केसोबासांची द्राष्टांतीक रचना मात्र शके १२१२ च्या सुमारास असावी.

उदा :- कुकडीयेचा दृष्टांत, मासकीयेचा दृष्टांत, कासवीयेचा दृष्टांत या तीनही दृष्टांतात परमेश्वराची मातेशी तुलना केलेली तर चारसी ऐचा दृष्टांत यात एखाद्या सुग्रणीने चारसीएच्या (पळीच्या) सहाय्याने पाप निश्चिती करावी. त्याप्रमाणे परमेश्वराच्या ठिकाणी जीवाला साधन करून त्यांच्याकडून मोक्ष साधनाची निश्चिती करीत असतो. माकडेयांचा दृष्टांत, आघारीयेचा दृष्टांत, परीसाचा दृष्टांत, कृष्णीयाचा दृष्टांत इ. यासारख्या दृष्टांतातून तत्कालीन जीवनाचे प्रतिबिंब उमटलेले दिसते.

**मूर्तिप्रकाश :-**

केसोबासांची रचना, १२०६ मध्ये रचलेला ग्रंथात श्री.चक्रधरांच्या मूर्तीचे व गुणांचे वर्णन या ग्रंथात आले आहे. ग्रंथाच्या सुरूवातीलाच -

**वर्णिता श्री.चक्रधराचा मूर्तिमयंकु |**
**आनंदे डोळविन त्रिभूवनाचा लोकु |**
**सुमना करीन संताशु सभेचिया लोकु |**

असे वर्णन आलेले केसोबासांची उपमा देण्याची हातोटी उल्लेखनिय आहे. आपले गुरू श्री.नागदेवाचार्य यांचा उपदेश मनासमोर ठेऊन त्यातील सार 'गुढे' ह्या ग्रंथात सांगितले आहे. त्यामुळे ह्या रचनेच्या प्रत्येक भागाला 'गुढा' असे म्हणतात. असे १२ गुढे त्यात आलेले आहेत.

RESEARCH JOURNEY

**पूजावसर :-**

बाई देववासांची ही रचना आहे. नागदेवचार्याकडून दिक्षा घेतली. नागदेवाचार्यानंतर पंथाचे आचार्यपद बाईदेव बासांना मिळाले. ह्या रचनेला 'नित्यादीलिला' असे ही म्हणतात. यात चक्रधरांच्या दिनचर्येचे अतिसुक्ष्म असे वर्णन आले आहे. हा ग्रंथ म्हणजे प्राचीन मराठी गद्याचा आदर्श नमुनाच आहे. चक्रधर व गोविंदप्रभू यांची जवळीक, सहवास बाईदेव बासांना लाभला त्यामुळे चक्रधरांच्या बारीक-सारीक हालचालींची नोंदणी यात आहे. प्रात:काळ, मध्यकाळ व सायंकाळ अशा तीनही वेळच्या त्यांच्या पूजाविधिचे प्रसंगवर्णन ह्यात आलेले आहेत.

**लीळाचरित्र :-**

'लीळाचरित्र' हा महानुभाव साहित्याचा आधारस्तंभ मानला जातो. स्वामी चक्रधरांचा जीवनग्रंथ म्हणजे मराठी साहित्यातील हा पहिला गद्य चरित्र ग्रंथ होय. चक्रधरांच्या निर्वाणानंतर या ग्रंथाची रचना झाली. त्यांचे सगळे अनुयायी, शिष्य ऋद्धीपुरास गोविंदप्रभू जवळ बसून त्यांच्या लीळा आठवित असत. त्याचवेळी ह्या सर्व लीळा संकलित करण्याची योजना आखली गेली. निरनिराळ्या व्यक्तींकडून आणल्या गेलेल्या, सांगितल्या गेलेल्या लीळांमधील सत्यासत्यता नागदेवाचार्य पारखून घेत असत. लीळाचरित्रात सुमारे ९५० लीळा आहेत. ह्या लीळा एकांक, पूर्वार्ध आणि उत्तरार्ध अशा ३ खंडात विभागला आहे. सुरूवातीच्या काळात स्वामींनी एकांकी भ्रमण केलेले त्या काळातील लीळा म्हणजे एकांक होय. भरवस येथील प्रधान पूत्राच्या मृतदेहात प्रवेश करून अवतार धारण केल्यापासून पैठण येथे त्यांचे आगमन झाले. येथपर्यंतचा भाग हा एकांकात येतो. एकांकातील लीळा स्वामींकडून आपल्या शिष्यांना वेळोवेळी प्रसंगोपात्त अशा

ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2016

सांगितल्या गेल्या आहेत. चक्रधरांनी बाईसावर अनुग्रह केला तेव्हापासून नागदेवांनी त्यांना अनुसरले. येथपर्यंतच्या लीळा ह्या पूर्वार्धात आणि नागदेवाचार्यांच्या अनुसरणापासून स्वामींच्या प्रयाणापर्यंतच्या लीळा ह्या उत्तरार्धातील लीळा होत. लीळाचरित्रातील केंद्रभूत व्यक्ती म्हणजे श्री.चक्रधर होत.

थोडक्यात यादवकाळ म्हणजे मराठी साहित्याचे सुवर्णयुग. या काळात निर्माण झालेल्या मराठी साहित्याने मराठी वाङ्मयाच्या इतिहासात अत्यंत मोलाची भर घातली व त्याला समृद्ध केले. या काळात महाराष्ट्रात विविध संप्रदाय अस्तित्त्वात होते. या संप्रदायांचे प्रवर्तक आपापले सिद्धांत सर्वसामान्यांसमोर ठेऊन त्यांना मुक्तीचा मार्ग दाखविण्याचा प्रयत्न करीत होते. तेराव्या शतकातील या वाङ्मयनिर्मितीत महानुभाव साहित्याचा सिंहाचा वाटा आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. **मराठी वाङ्मयाभिरूचीचे विहंगमावलोकन** - रा.श्री.जोग.
२. **महानुभाव साहित्य शोध : शोध संचार** - डॉ.अविनाश आवलगांवकर.
३. **यादवकालीन महाराष्ट्र** - मु.ग.पानसे.
४. **महानुभाव व संत वाङ्मय** - डॉ.रमेश आवलगांवकर, डॉ.अरूणा ढेरे.